# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१९४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.२८ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


# मालवणमध्ये राडा, आधी घोषणाबाजी मग हाणामारी

## ठाकरे- राणेंसमोरच कार्यकर्ते भिडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई** : मालवणमध्ये महाविकास आघाडी आणि भाजप कार्यकर्ते आमनेसामने आले आहेत. तेव्हा आदित्य ठाकरेंसमोर कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली होती. मालवणमध्ये तुफान राडा झाल्यांच दिसत आहे. राणे समर्थक आदित्य ठाकरेंवर धावून गेल्याचं देखील समोर आलंय. आज मालवणमध्ये महाविकास आघाडीकरून जनसंताप मोर्चाचं आयोजन करण्यात आलंय.

मालवणमध्ये सध्या तणावाचं वातावरण आहे. राजकोट किल्ल्यावरील शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी आज मालवण बंदची हाक देण्यात आली होती. महाविकास आघाडी आणि महायुतीचे नेते आज मालवणमध्ये आहेत. मालवण बंदला व्यापाऱ्यांनी देखील मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिल्याचं दिसत आहे. मालवणमध्ये भाजपचे नेते नारायण राणे दाखल होताच कार्यकर्त्यांनी आदित्य ठाकरेंविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली होती.

भाजप आमदार वैभव नाईक यांच्यासह इतर कार्यकर्त्यांमध्ये तणाव निर्माण झाला होता. दरम्यान आदित्य ठाकरे आणि नारायण राणे एकमेकांसमोर आले होते. तेव्हा कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली होती. राजगड क्लि्ल्यावर हे तणावाचं वातावरण आहे. पोलीस कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यामुळे सध्या कार्यकर्त्यांमध्ये मोठं संतापाचं वातावरण आहे.राजगड किल्ल्यावर राणे समर्थक जोरदार घोषणाबाजी करत (Malvan News) आहेत. दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते आक्रमक झाल्याचं पाहायला मिळतंय.



तर मालवणमध्ये ठाकरे राणे समर्थकांमध्ये जोरदार राडा झालाय. गडावरच दोन्ही गटाचे कार्यकर्ते भिडले असल्याचं व्हिडिओमध्ये पाहायला मिळत आहे. तर आदित्य ठाकरे कार्यकर्त्यांना घोषणाबाजी थांबावण्याचं आवाहन करत आहे.

राणे समर्थकांनी मात्र आक्रमक भूमिका घेतलेली आहे.ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे हे राजकोट किल्ल्यावर पोहचल्यावर राणे समर्थकांकडून पेंग्विन, पेंग्विन अशा घोषणा देण्याचा प्रयत्नही झाला.

### बालीशपणात मला पडायचे नाही

दरम्यान, राणे समर्थकांकडून गोंधळ करण्याचा प्रयत्न सुरू असतानाच आदित्य ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यांनी म्हटले की, राज्य सरकारने पुतळ्याची सर्व जबाबादारी झटकत नौदलावर खापर फोडण्यात आले आहे. महाराष्ट्रात ज्या काही घटना होत आहे, त्यात भ्रष्टाचारी खोके सरकारचा भ्रष्टाचार वरपासून खालपर्यंत आहे. आता यांच्या भ्रष्टाचाराने महाराजांना देखील सोडले नाही. २४ वर्षाच्या मुलाला कंत्राट कोणी दिले? तो फरार आहे, त्याला पळून जाण्यासाठी कोणी मदत केली? पीडब्ल्यूडीचे मंत्री आहेत त्यांच्यावर एफआयआर दाखल झाली आहे का? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. तसेच मी येत असताना राडा झाला. पत्रकाराला धक्काबुक्की झाली. मी आमच्या कार्यकर्त्यांना सांगितले आहे की, महाराजांच्या किल्ल्यांमध्ये आपल्याला राजकारण करायचे नाही. मी आमच्या कार्यकर्त्यांना अडवले आहे. या बालीशपणात मला पडायचे नाही. त्यांना पंतप्रधानांना खुश करायचे, अशी टीकाही आदित्य ठाकरे यांनी केली.

# मोहन भागवतांना आता पंतप्रधान मोदींच्या दर्जाची सुरक्षा, अचानक का केले बदल?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नागपूर-** शरद पवार यांना काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारकडून झेड प्लस सुरक्षा देण्यात आली आहे. त्यानंतर आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत (ठडड यांच्या सुरक्षेत मोठी वाढ करण्यात आली आहे. भागवतांना पंतप्रधान मोदीं इतकी सुरक्षा देण्यात आली आहे. मात्र अचानक सुरक्षेत वाढ का करण्यात येत आहे, याबद्दल सवाल उपस्थित केले जात आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने दिलेल्या



माहितीनुसार, मोहन भागवतांना आधी झेड प्लस सुरक्षा होती, त्यात वाढ करून एडवान्स सिक्युरिटी लाइजन (-डङ) पर्यंत करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनाही इतकीच सुरक्षा दिली जात आहे. भागवतांची सुरक्षा का वाढविण्यात आली, याबद्दल सवाल उपस्थित केला जात आहे. त्यांना पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांइतकी सुरक्षा देण्यात आली? त्यांना कोणाची भीती आहे? टीओआयच्या सूत्रां नुसार , भागवतांच्या सुरक्षेच्या समीक्षेनंतर ही वाढ करण्यात आली आहे. कथितपणे भाजप व्यतिरिक्त इतर पक्षांचे राज्य असलेल्या राज्यांमध्ये भागवतांच्या दौऱ्यादरम्यान त्यांच्या सुरक्षेत काही कमतरता आढळली होती. ज्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. भागवत हे अनेक कट्टरपंथी मुस्लीम संघटनांसह अनेक संघटनेंच्या निशाण्यावर असल्याचं सांगितलं जात आहे.

### ASL सुरक्षेत काय काय असतं?

-डङ अंतर्गत संरक्षण देणाऱ्या व्यक्तीच्या सुरक्षेशी संबंधित जिल्हा प्रशासन, पोलीस, आरोग्य आणि या स्तरावरील इतर विभागांचा सहभाग अनिवार्य आहे. यात बहुस्तरीय सुरक्षा घेरासह तोडफोडविरोधी तपासाचा समावेश आहे. हेलिकॉप्टर प्रवासाला केवळ खास डिझाइन केलेल्या हेलिकॉप्टरमध्ये परवानगी दिली जाईल आणि ते ठरलेल्या प्रोटोकॉलनुसार चालतील.

# पुढच्या महिन्यात सुरू होणार भाजप सदस्य मोहीम

## 'सदस्यत्व अभियानाचा पहिला टप्पा २५ सप्टेंबरपर्यंत चालेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ नवी दिल्ली**

भारतीय जनाता पक्ष २ सप्टेंबरपासून सदस्यत्व मोहीम सुरू करणार आहे. भाजपच्या म्हणण्यानुसार, एका मोबाइल क्रमांकावर कॉल करून, थहरींी-ीं, ठट कोड स्कॅन करून आणि छरचे ॲपच्या माध्यमाने पक्षाचे सदस्य होता येऊ शकते. या सदस्यत्व मोहिमेच्या माध्यमातून भाजप आपल्या सदस्यांसंदर्भात मोठ्या प्रमाणावर माहितीही गोळा करणार आहे. यात पक्षाच्या सदस्यांची जात, लिंग, वय, निवास आदींचा समावेश आहे. महत्वाचे म्हणजे, भाजपला जानेवारी २०२५ मध्ये नवीन अध्यक्षाचीही निवड करायची आहे.

भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डा २ सप्टेंबर २०२४ रोजी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सदस्यत्वाचे नूतनीकरण करून मोहिमेची सुरुवात करतील. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा सदस्यत्व मोहिमेचे प्रमुख विनोद तावडे यांनी सांगितले की, 'सदस्यत्व अभियानाचा पहिला टप्पा २५ सप्टेंबरपर्यंत चालेल. यानंतर, एक




### भाजपचे सध्या किती सदस्य?

तत्पूर्वी, या मोहिमेच्या माध्यमाने १० कोटींहून अधिक सदस्य बनवीने पक्षाचे लक्ष्य असेल, असे भाजपने म्हटले होते. यात, पुढील काही महिन्यांत ज्या राज्यांत निवडणुका आहेत, त्यांचा समावेश करण्यात आलेला नाही. गेल्या वेळच्या सदस्यत्व मोहिमेनुसार, भाजपची सदस्य संख्या १८ कोटी एवढी होती. यावेळी हा आकडा पार केला जाईल, असा विश्वासही पक्षाने व्यक्त केला होता.

ऑक्टोबरला दुसऱ्या टप्प्याला सुरुवात होण्यापूर्वी, याची समीक्षा केली जाईल. ही १५ ऑक्टोबर पर्यंत सुरू राहील.

१६ ते ३१ ऑक्टोबरपर्यंत, सक्रिय सदस्यांची नोंदणी करण्यात येईल. हे सक्रिय सदस्य निश्चित संख्येने नवे सदस्य बनवून संघटनात्मक निवडणुकीत भाग घेऊ शकतील. पीटीआयने सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, भाजपच्या पूर्णवेळ अध्यक्षाच्या निवडीपूर्वी कार्यकारी अध्यक्षाच्या नियुक्तीची कसलीही योजना नाही.नवे लोक एका मोबाइल क्रमांकावर कॉल करून, ठट कोड स्कॅन करून, वॉट्सॲप क्रमांकावर मेसेज करून, नमो ॲपच्या माध्यमाने आणि भाजपच्या वेबसाइटच्या माध्यमाने पक्षाचे सदस्य होऊ शकतात. मात्र, दुर्गम भागांत पक्ष पारंपरिक पद्धतीने कागदावरच रजिस्ट्रेशन करेल.

# रविवारी सरकार विरोधात मविआचे जोडे मारो आंदोलन

## छत्रपतींचा पुतळा कोसळल्यानंतर विरोधक आक्रमक; ठाकरे, पवार, पटोलेंचा एका सुरात हल्ला

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२८मुंबई** मालवण मधील समुद्र किणारी असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर राज्यातील महाविकास आघाडी चांगलीच आक्रमक झाली आहे. त्यामुळे आम्ही सरकार विरोधात रविवार आंदोलन करणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. मुंबईतील हुतात्मा स्मारकापासून तर गेट वे ऑफ इंडियाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत आम्ही जाणार असल्याचे ठाकरे यांनी सांगितले. या सरकारचा निषेध करण्यासाठी सरकारला जोडे मारो आंदोलन आयोजित करण्यात आले असल्याची माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली.

महाराष्ट्रामध्ये एक प्रकारची अस्वस्थता दिसून येत आहे. दिवसागणिक महाराष्ट्रामध्ये महिलांवरील अत्याचार वाढत आहेत, भ्रष्टाचार वाढत आहे. मालवण मध्ये जे घडले तसे आज पर्यंत महाराष्ट्रात कधीही घडले नव्हते. शिवछत्रपतींचा पुतळा समुद्रामध्ये कोसळला आहे. त्यामुळे महाफुटीच्या सरकारने भ्रष्टाचाराचा कळस गाठला आहे. त्यांचा कारभार किळसवाणा असल्याची



टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. या घटनांचा निषेध करण्यासाठी आम्ही महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. मात्र न्यायालयाच्या माध्यमातून त्याच्यावर देखील बंदी आणली गेली, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

मालवण मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला याचा केवळ निषेध करून ही फाईल बंद करता येणार नाही. या कामामध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. देशांमध्ये इतके पुतळे उभे आहेत, समुद्रात, पाण्यात पुतळे उभे आहेत. मात्र ते कोसळले नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस हे खरे शिवभक्त असतील तर ते दीपक केसरकर यांना मंत्रालयाच्या समोर जोडे मारतील, अशा शब्दात संजय राऊत यांनी राज्य सरकारचा समाचार घेतला.

# विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला जॅकपॉट लागणार?

## ८५ जागांवर अनुकूल परिस्थिती, अंतर्गत सर्व्हेचा रिझल्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ मुंबई** राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचा उत्साह वाढवणारी एक बातमी समोर आली आहे. काँग्रेसकडून आगामी निवडणुकांसाठी एक सर्वेक्षण करण्यात आले होते. विधानसभा निवडणुकांसाठी काँग्रेसकडून करण्यात आलेला हा अंतर्गत सर्व्हे आहे. या स ठ ह ` म ६ य ` महाविकासआघाडीचे सरकार येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच महाविकासआघाडीत काँग्रेस हाच मोठा भाऊ ठरण्याची शक्यता आहे. तर महायुतीसाठी विधानसभा निवडणूक अवघड असल्याचे देखील या सर्व्हेतून समोर आा आहे. ताज्या सर्वेक्षणाचा अहवाल पाहता महाविकास आघाडीचे आशादायक चित्र असल्याची चिन्हं दिसत आहेत.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसनं राज्यात १३ जागा निवडून आणल्या. गेल्या लोकसभा निवडणुकीत केवळ १ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसनं यंदाच्या निवडणुकीत सत्ताधारी




भाजपचे तीन तेरा वाजवले. विदर्भ, मराठवाड्यात दमदार कामगिरी करुन काँग्रेसनं राज्यात जोरदार कमबॅक केलं. त्यानंतर आता पक्षानं विधानसभेसाठी कंबर कसली आहे. काँग्रेसच्या अंतर्गत सर्व्हेमुळे पक्षात उत्साह संचारला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने अंतर्गत सर्व्हे केला आहे. काँग्रेसच्या या प्राथमिक सर्व्हेमध्ये महाविकासआघाडीची सत्ता येण्याची शक्यता वर्तवली आहे. सर्व्हेनुसार सर्वाधिक म्हणजे ८०-८५ जागा काँग्रेसला मिळण्याची शक्यता आहे. तर सर्वात कमी म्हणजे ३०-३५ जागा ठाकरे गटाला मिळण्याचा अंदाज आहे.

**सर्वात कमी जागा ठाकरे गटाला**

सर्व्हेतून समोर आलेल्या माहितीनुसार, आगामी विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष म्हणून काँग्रेस पुढे येण्याची शक्यता आहे. जवळपास ८०-८५ जागा मिळण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला ५५-६० जागा तर सर्वात कमी म्हणजे ३० ते ३५ जागा ठाकरे गटाला मिळण्याची शक्यता आहे. हा अंतर्गत काँग्रेस पक्षाचा सर्व्हे आहे.

## संपादकीय ......

# रस्ते द्या रस्ते!

विदेशी गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्राने अग्रस्थान ठेवले असून, राज्यात ठिकठिकाणी उद्योग विकासाला गती दिली जात आहे. गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र, तेलंगणा, केरळ, हरियाणा, हिमाचल प्रदेश ही राज्येही झपाट्याने पुढे येत असून, गुंतवणूक खेचून घेण्याची तीव्र स्पर्धा सुरू झाली आहे. महाराष्ट्रात तंत्रशिक्षितांची फळीच्या फळी उपलब्ध आहे. बंदरे, विमानतळ या सुविधा आहेत; पण विकासाचा गाडा गतीने पळण्यासाठी आवश्यक रस्त्यांचे जाळे मात्र कोलमडल्याचे दिसून येते. मालवाहतुकीसाठी उत्तम रस्ते आवश्यक असतात. अन्यथा देशातल्या देशात किंवा विदेशात माल वेळेवर पाठवता येत नाही. त्यामुळे उत्पादक व निर्यातदारांना नुकसान सोसावे लागते. अनेक कारखान्यांना कच्चा माल, यंत्रसामग्री आयात करावी लागते आणि विमानतळापासून अथवा बंदरापासून तो माल ट्रकने कारखान्यापर्यंत आणावा लागतो; पण वाईट रस्त्यांमुळे तो वेळेवर येत नाही व नुकसानीला सामोरे जावे लागते; पण केवळ उद्योगधंद्यांसाठी नव्हे, तर सामान्यजनांनाही चांगले रस्ते उपलब्ध करून देणे, हे शासनाचे प्राथमिक कर्तव्य आहे. आज देशातील रस्ते अपघातांत पहिल्या क्रमांकावर तामिळनाडू आहे. त्यानंतर मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, कर्नाटक, केरळ आणि महाराष्ट्र अशी क्रमवारी आहे. महाराष्ट्र या यादीत २०१७ पासून सतत सहाव्या क्रमांकावर कायम आहे. सुप्रीम कोर्टाने देशात 'रस्ता सुरक्षा कक्ष' स्थापन करूनही अपघात कमी करण्यात अपयश आले आहे. समृद्धी महामार्गासह राज्यातील महामार्गांवर मोठ्या संख्येत अपघात झाले आहेत. गतवर्षी २९ हजारांपेक्षा अधिक रस्ते अपघात राज्यात झाले आहेत. रस्त्यावरचे खड्डे आणि नको त्या ठिकाणी असलेले स्पीड ब्रेकर ही अपघातांची प्रमुख कारणे आहेत. भक्ती बर्वे, अक्षय पेंडसे, आनंद अभ्यंकर हे कलावंत तसेच उद्योगपती सायरस मिस्त्री आणि शिवसंग्राम संघटनेचे नेते विनायक मेटे हे रस्ते अपघातांचेच बळी ठरले. आता गणेशोत्सव तोंडावर असून, त्यावेळी मुंबईतून कोकणात जाणाऱ्यांची संख्या प्रचंड असते. अशावेळी मुंबई–गोवा महामार्गाची दुरवस्था झाली असून, गेली ११ वर्षे या रस्त्याचे काम रखडले आहे. या महामार्गाचे काम अपूर्ण ठेवणाऱ्या आणि लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या ठेकेदारांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पाहणी दौऱ्यावेळी रायगड जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांना दिले आहेत. महामार्गाच्या पळस्पे ते माणगावदरम्यानच्या कामांची त्यांनी पाहणी केली. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनीच अलीकडे कोकणातील रस्त्यांच्या दुर्दशेवरून सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांना धारेवर धरले होते. स्वीडन व स्वित्झर्लंड या देशांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करून अपघातांची संख्या घटवण्यात यश मिळवले आहे. देशात रस्त्यांसाठी टोल आकारण्याची पद्धत आणली गेली. ठाणे–भिवंडी बायपास हा देशातील बीओटी (बांधा, वापरा, हस्तांरित करा) तत्त्वावरील पहिला प्रकल्प आणला गेला. जनतेला उत्तम रस्ते हवे असतील, ईप्सित स्थळी लवकर पोहोचायचे असेल, अडथळे कमी हवे असतील, तर त्यासाठी किंमत मोजायचीही तयारी असणे आवश्यक आहे; पण आता जनतेने ती मानसिकता तयार केली असताना रस्ते मात्र अनेक ठिकाणी धाराशाही झालेले दिसतात. दुसरीकडे टोल मात्र सुरूच आहे. महागड्या टोलमुळे सर्वसामान्य जनता हैराण झाली आहे. अनेक ठिकाणी टोलमाफिया निर्माण झाले असून, संगनमत करून, खर्च वसुलीनंतरही टोल आकारणी केली जाते. यासंबंधी अनेक माहिती अधिकाऱ्यांनी सरकारला जाब विचारला; पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही.पुणे–मुंबई द्रुतगती महामार्ग नितीन गडकरी महाराष्ट्रात सार्वजनिक बांधकाममंत्री असतानाच पूर्ण झाला आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी तेव्हा त्यांचे कौतुकही केले. देशात २६ ग्रीन एक्स्प्रेस हायवे बनवले जात असून, हे लक्षणीय आहे. दोन वर्षांत भारतातील रस्ते अमेरिकेसारखे बनतील, अशी घोषणा गडकरी यांनी पूर्वीच केली होती; मात्र रस्त्यांची देखभाल व्यवस्थित होत नाही, रस्त्यांची कामे दर्जेदार आणि टिकाऊ होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. याबद्दल गडकरी यांनी अनेकदा ठेकेदार, कंत्राटदारांना ठणकावले आहे; मात्र त्याचा फारसा परिणाम झाल्याचे दिसत नाही. 'अमेरिका श्रीमंत देश आहे, म्हणून अमेरिकेतील रस्ते चांगले आहेत, असे नाही, तर अमेरिकेतील रस्ते चांगले आहेत, म्हणून अमेरिका श्रीमंत आहे' असे अमेरिकेचे भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी म्हणत असत. थोडक्यात, ज्या देशात उत्तम रस्ते, त्या देशाचे दळणवळण गतिमान आणि कार्यक्षम व जलद वाहतुकीमुळे व्यापार, उद्योगाची, आयात–निर्यातीची भरभराट!

मुंबई–गोवा महामार्गाचे काम पूर्ण होण्याबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरींपासून ते माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांच्यापर्यंत अनेकांनी हमी दिली; पण रस्त्यांची चाळण झाली असल्यामुळे कोकणवासीयांचा संताप अनावर झाला आहे. पुणे–नाशिक महामार्ग, मुंबई–अहमदाबाद रस्ता, मुंबई–नाशिक महामार्ग, पुणे–सातारा–कागल महामार्ग येथेही सर्व आनंदी आनंदच आहे. समृद्धी महामार्गाबाबतही तक्रारी असून, तेथे मोठ्या दुर्घटना झाल्या आहेत. मुळात रस्त्यांच्या कामात गुणवत्ता असावी, हा आग्रहच धरला जात नाही. पुन्हा–पुन्हा कामे काढून टेंडर संस्कृतीची जोपासना करण्यातच व्यवस्थेला रस असतो. जनतेच्या जीवाची कोणालाही पर्वा नाही. अशावेळी संबंधित ठेकेदार व सरकारी अधिकारी यांची साखळी तोडली पाहिजे. चांगले रस्ते हाही बदलत्या काळात नागरिकांचा हक्कच आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. जनता रस्त्यावर येण्याआधी ते करणे हिताचे!




## घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या या जगात भारतीयांचे हृदय किती निरोगी

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

सध्याच्या धकाधकीच्या आणि ताणतणावाच्या जीवनात अनेकांचे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते. घड्याळाच्या काट्यावर धावणाऱ्या या जगाचा वेग धारण करून त्याच वेगाला अनुसरून आयुष्य जगणारे अनेकजण दर दिवशी पाहायला मिळतात. पण, त्यांची हीच सवय कळत – नकळत आरोग्यावरही थेट परिणाम करताना दिसत आहे.

खाण्यापिण्याच्या सवयी आणि वेळांपासून अगदी नोकरीच्या ठिकाणी बसण्याच्या पद्धतीपर्यंतची प्रत्येत लहानमोठी गोष्ट थेट आरोग्यावर आणि हृदयावरही परिणाम करताना दिसत आहे. आता हृदयावर हा परिणाम नेमका कसा होतोय? याचीच माहिती इंडियन हार्ट जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आली आहे.

भारतातील वायव्येकडील राज्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांमध्ये सध्या हायपर कोलेस्ट्रोलेमियाचा धोका वाढत असून, ही एक अशी स्थिती आहे जिथं रक्तात बॅड कोलेस्ट्रॉल अर्थात एलडीएलचं प्रमाण वाढून 'गुड' कोलेस्ट्रॉल (एचडीएल) चं प्रमाण कमी होतं.इंडियन कार्डियोलॉजी सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीनं करण्यात आलेल्या या निरीक्षणानुसार विविध भौगोलिक क्षेत्रांमधील व्यक्तींच्या मदतीनं ही माहिती मिळवण्यात आली. या अहवालातून समोर आलेल्या आकडेवारीनुसार देशाचील पूर्वेकडील राज्यांमध्ये १८.८ टक्के, पश्चिमेला असणाऱ्या राज्यांमध्ये २९.२ टक्के, उत्तरेकडील राज्यांमध्ये २८.२ टक्के आणि दक्षिणेकडील राज्यांमध्ये २४.५ टक्के नागरिकांमध्ये हायपर कोलेस्ट्रॉलेमियाची समस्या आढळली.

हृदयरोग, पक्षाघात आणि इतर अनेक गंभीर आजाराची सुरुवात किंवा मूळ कारण म्हणजे हायपरकोलेस्ट्रॉल



किंवा हायपर कोलेस्ट्रॉलेमिया ही स्थिती. धमन्यांमध्ये प्लाक जमा करून त्यातून सुरू असणाऱ्या रक्तप्रवाहामध्ये अडचणी निर्माण करण्याचं घातक काम हायपर कोलेस्ट्रॉल करतं. त्यामुळं वेळीच या स्थितीचं निदान होणंही तितकंच महत्त्वाचं.

समोर आलेल्या निरीक्षणानुसार हाय कोलेस्ट्रॉल आकडेवारीच्या बाबतीत केरळ आघाडीवर असून, इथं जवळपास ५०.३ टक्के नागरिकांच्या कोलेस्ट्रॉलची पातळी सामान्यहून अधिक आहे. ही अतिशय गंभीर बाब असून, त्यामागोमाग गोवा (४५.६%) आणि हिमाचल प्रदेश (३९.६%) या राज्यांची नावं येतात.

उत्तर भारताकडील राज्यांमध्ये देशातील असे सर्वाधिक नागरिक आहेत ज्यांच्या शरीरात बॅड कोलेस्ट्रॉलची टक्केवारी जास्त असून, ही चिंतेची बाब आहे. त्यामागोमाग पश्चिम भारत (३०.२%), दक्षिण भारत (२३.५%), पूर्व भारत (१९.२%) अशी क्रमवारी समोर येते.

# कपाशीवरील किडींची आर्थिक नुकसानीची पातळी ओळखून कसे कराल जैविक व्यवस्थापन

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक**

सद्यस्थितीत कपाशीचे पिक पाते, फुले व बोंडे धरण्याच्या अवस्थेत असून काही ठिकाणी रसशोषक किडी प्रामुख्याने तुडतुडे, फुलकीडे तसेच गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

कपाशीच्या पिकामध्ये डोमकळ्या (पुर्णपणे न उमललेल्या कळ्या) दिसून येत आहेत, अशा डोंमकळ्यामध्ये गुलाबी बोंडअळीच्या दुसऱ्या अवस्थेतील अळ्या असतात.

त्यामुळे शेतकरी बांधवांनी कपाशी पिकाचे लगेच सर्वेक्षण करुन या रसशोषक किडी तसेच गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**किडी–**

१) रस शोषण करणाऱ्या किडी : मावा, तुडतुडे, फुलकिडे, पांढरी माशी इ.

२) बोंडअळी : गुलाबी बोंडअळी.

आर्थिक नुकसान पातळी

मावा : १५ ते २० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे किंवा १० मावा/पान.

तुडतुडे : २ ते ३ पिल्ले/पान.

फुलकिडे : १० फुलकिडे/पान.

पांढरी माशी : ८ ते १० प्रौढमाश्या/पान.

गुलाबी बोंडअळी : ५ ते १० टक्के कळ्या, फुले, बोंडाचे नुकसान किंवा ८ ते १० पतंग/सापळा सलग ३ दिवस.

एकात्मिक व्यवस्थापन

– शेताच्या कडेने तसेच पडीक जमीनीतील किडींच्या पर्यायी वनस्पती नष्ट कराव्यात.

– शेताची कोळपणी व खुरपणी करुन शेत तण विरहित ठेवावे.

– रस शोषण करणाऱ्या किडी व बोंडअळीचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून नत्र खताचा संतुलित वापर करावा.

– पांढऱ्या माश्यांना आकर्षित करण्यासाठी शेतामध्ये १२ ते १५ पिवळे चिकट सापळे प्रती हेक्टरी लावावेत.

– मित्र कीटकांचे संवर्धन करावे.

– रस शोषक किडीच्या नियंत्रणासाठी लिकॅनीसिलियम (व्हर्टिसिलियम) लिकॅनी १.१५ % डब्ल्युपी ५० ग्रॅम या जैविक कीटकनाशकाची प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी घ्यावी.

– गुलाबी बोंडअळ्यांच्या सर्वेक्षणासाठी ४ ते ५ कामगंध सापळे व मोठ्या प्रमाणात नर पतंग पकडण्यासाठी २५ सापळे प्रति हेक्टरी लावावेत.

– पक्ष्यांना बसण्यासाठी २५ पक्षी थांबे प्रति हेक्टरी लावावेत. त्यामुळे पक्षी त्यावर बसून शेतातील किडी टिपून खातील.

– प्रादुर्भावग्रस्त व गळलेली पाते, बोंडे जमा करून नष्ट करावी.

– गुलाबी बोंडअळीग्रस्त डोमकळ्या तोडून आतील अळीसह नष्ट कराव्यात.

– गुलाबी बोंडअळीसाठी ट्रायकोग्रामाटॉयडिया बॅक्ट्री या परोपजीवी गांधिलमाशीच्या अंड्याचे कार्ड (१.५ लाख अंडी/हे.) पिकावर लावावेत.

– ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा झाडीरॅक्टीन १०००० पीपीएम १० मिली किंवा १५०० पीपीएम २५ मिली किंवा झाडीरॅक्टीन ३००० पीपीएम ५० मिली प्रति १० लिटर पाण्यातून प्रतिबंधात्मक फवारणी करावी.

– किडीने आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्या नंतरच लेबल क्लेम नुसार खालील रासायनिक किटकनाशकांचा आलटून पालटून वापर करावा.

**तांत्रिक माहिती व सहकार्य**

**कीटकशास्त्र विभाग वनामकृवि, परभणी.**



कपाशीतील किडींचा बंदोबस्त

# 'मुख्यमंत्री वयोश्री योजने'साठी जेष्ठ नागरिकांना अर्ज करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती,**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील जेष्ठ नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरु करण्यात आली आहे. जेष्ठांमध्ये वयोमानपरत्वे येणारे अपंगत्व, अशक्तपणा निराकरणासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करणे तसेच मानसिक स्वास्थ्य संतुलित ठेवण्यासाठी मनस्वास्थ्य केंद्रे, योग उपचार केंद्राव्दारे प्रबोधन, प्रशिक्षणासाठी पात्र लाभार्थ्यांना तीन हजार रुपये एकरकमी थेट लाभ त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. लाभ वितरण झाल्यावर या योजनेंतर्गत विहित केलेली उपकरणे खरेदी केल्याचे तसेच मनस्वास्थ्य केंद्राव्दारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे देयक प्रमाणपत्र ३० दिवसाच्या आत सहायक आयुक्त समाज कल्याण यांच्या प्राप्त करुन घ्यावे.

या योजनेसाठी अर्जदार हा महाराष्ट्राचा कायमस्वरुपी रहिवासी असावा. जेष्ठ नागरिकांचे वय हे किमान ६५ वर्ष असावे. तसेच या योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न दोन लाखाच्या आत असणे आवश्यक आहे.

या योजनेत जेष्ठ नागरिकांना ३ हजार रुपये थेट बँक खात्यात मिळतात. यामधून वृध्द लोकांसाठी उपयुक्त अशी श्रवणयंत्रे, फोल्डिंग वॉकर, बॅक सपोर्ट बेल्ट, सर्वाइकल कॉलर, चष्मा, ट्रायपॉड, स्टिक व्हीलचेअर, कमोड चेअर आदी उपकरणे खरेदी करता येतात. यासाठी आधार कार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयकृत तथा कुठल्याही कोअर बँकेच्या पासबुकची झेरॉक्स, स्वयंघोषणापत्र, शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहित केलेली अन्य कागदपत्रे, आरोग्य प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, समकक्ष योजनेचा लाभ घेतला नसल्याचे स्वयंघोषणापत्र, बीपीएल कार्ड झेरॉक्स आदी कागदपत्रे आवश्यक आहे.या योजनेचे अर्ज ज्येष्ठ मंडळी त्यांच्या सोयीनुसार आपआपल्या तालुक्याच्या ठिकाणी तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय तसेच सहायक आयुक्त समाजकल्याण कार्यालय, अमरावती येथे जमा करु शकतात. परिपूर्ण कागदपत्र जोडलेले अर्ज सादर करुन ज्येष्ठांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन समाजकल्याणच्या सहायक आयुक्त माया केदार यांनी केले आहे.

# शासनाने खरेदी केलेल्या ज्वारीचे ९.८० कोटींचे चुकारे कधी मिळणार हो साहेब !

## आर्थिक अडचणीतील शेतकरी प्रतीक्षेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती –** शासन आधारभूत किमतीनुसार जिल्ह्यात आतापर्यंत ८३,५५१ क्विंटल उन्हाळी ज्वारीची खरेदी करण्यात आली. यामध्ये खरेदी केलेल्या ज्वारीचे ९.८० कोटींचे चुकारे अद्याप शासनाने दिलेले नाहीत. त्यामुळे आर्थिक अडचणीतील प्रतीक्षेत आहेत.

किमान आधारभूत खरेदी योजनेत जिल्ह्यात उन्हाळी ज्वारीची खरेदी नऊ तालुक्यातील खरेदी–विक्री संघामार्फत करण्यात येत आहे. जिल्ह्यात यावर्षी उन्हाळी ज्वारीचा पेरा वाढला. शासनानेही ३,१८० रुपये क्विंटल असा हमीभाव दिलेला आहे. त्यातुलनेत खासगीमध्ये २००० ते २२०० रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. त्यामुळे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांची धाव शासन खरेदी केंद्रांकडे आहे. विशेष म्हणजे, शासनानेही जिल्ह्याचे लक्ष्यांक दोन वेळा वाढवून दिले व खरेदीसाठी ३१ ऑगस्ट ही



अंतिम मुदत दिली आहे.

जिल्ह्यात २७ जूनपर्यंत ३,६९२ शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली. त्यातुलनेत २६ ऑगस्टपर्यंत २,४४७ शेतकऱ्यांची ८३,५५१ क्विंटल ज्वारी खरेदी केली गेली. शासनाने वाढीव ६१ हजार क्विंटलचे टार्गेट दिल्याने जिल्ह्यात १.६१ लाख क्विंटल ज्वारीची खरेदी शासनमान्य दराने होणार आहे

### ज्वारी खरेदीची जिल्हा स्थिती

आतापर्यंत झालेली खरेदी: ८३,५५१

क्विंटल हमीभावाने होणारी रक्कम २६,५६,९५१०५ रु.

शासनाकडून प्राप्त रक्कम : १६,७६,३३,२२३ रु.

वाटप केलेली रक्कम : १६,६२,७३,५८३ रु.

शासनाकडून अप्राप्त रक्कम: ९,८०,६१,८८२ रु.

RNI No. - MAHMAR 2023/84526

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com

या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. २८ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण


# बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवर सरकारचा अंकुश

## आ. बच्चू कडू यांच्या निर्देशानुसार शासकीय संस्थांमधील नियुक्तीसाठी दिव्यांग नियमावली जाहीर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती** 'शासकीय ,निमशासकीय तसेच शासनाकडून निधी प्राप्त होणाऱ्या संस्थांमध्ये नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवर आता राज्य सरकारने अंकुश लावला असून दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी दिलेल्या निर्देशानुसार दिव्यांगांची नियमावली जाहीर करीत उमेदवारांच्या दिव्यांगत्वाची तपासणी करण्याचा निर्णय दिव्यांग कल्याण मंत्रालयाने घेत १६ ऑगस्ट रोजी त्या संदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच शासनाकडून निधी प्राप्त होणाऱ्या संस्थांमध्ये पदभरती होत असताना दिव्यांगांना सरकारी नियमाप्रमाणे चार टक्के आरक्षण देण्यात येते तसेच सरळ सेवेत नोकरी देताना देखील दिव्यांगांना चार टक्के आरक्षणाची तरतूद आहे. परंतु बोगस दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरी व अन्य शासकीय लाभ घेण्यात येत असल्याच्या अनेक तक्रारी राज्य सरकारकडे प्राप्त झाल्या होत्या.

परिणामी खऱ्या अर्थाने दिव्यांग बांधव नोकरी किंवा अन्य लाभापासन वंचित राहत होते. दिव्यांग, शेतकरी, कष्टकऱ्यांचे नेते आणि दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी या गंभीर बाबीची दखल घेत अशा प्रकारच्या गंभीर प्रकारांवर चाप बसावा यासाठी नियुक्त होणाऱ्या उमेदवारांच्या दिव्यांगत्वाची तपासणी करणे तसेच यासाठीची दिव्यांग नियमावली जाहीर करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाला सूचित केले होते.

बोगस दिव्यांग प्रकरणी प्राप्त तक्रारी आणि आमदार बच्चू कडू यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाने नियुक्त होणाऱ्या उमेदवारांच्या दिव्यांगत्वाची तपासणी करण्याबाबतची नियमावली जाहीर करीत तसा शासन निर्णय १६ ऑगस्ट रोजी निर्गमित केला. या शासन निर्णयामुळे यापुढे शासकीय, निमशासकीय विभागात नियुक्त होणाऱ्या दिव्यांग उमेदवाराच्या दिव्यांग प्रमाणपत्राची नियमाप्रमाणे तपासणी होणार असल्यामुळे बोगस दिव्यांग नियुक्तीला चाप बसणार आहे.

### खऱ्या दिव्यांगांना मिळणार लाभ

आ कडूखोट्या दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय, निमशासकीय संस्थांमध्ये नोकरी किंवा अन्य लाभ मिळवून अनेक लोकांनी खऱ्या अर्थाने दिव्यांग असलेल्या दिव्यांग लोकांचा हक्क व अधिकार हिरावत त्यांना वंचित ठेवण्याचे काम केले आहे. हे गंभीर प्रकार लक्षात घेता या संदर्भात एक नियमावली करून दिव्यांग प्रमाणपत्राची तपासणी करण्यासंदर्भातील निर्देश अधिनस्त यंत्रणेला दिले होते .त्यानुसार दिव्यांग कल्याण विभागाने १६ ऑगस्ट रोजी नियमावली व प्रमाणपत्र तपासणी करण्याबाबत शासन निर्णय जारी केला. या निर्णयामुळे आता यापुढे खऱ्या अर्थाने दिव्यांग बांधवांना लाभ मिळून त्यांना त्यांचा हक्क व अधिकार मिळणार असल्याचे आ बच्चू कडू म्हणाले. सोबतच या कामी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खूप सहकार्य करीत दिव्यांग बांधवांना न्याय दिल्याबद्दल सर्व दिव्यांग बांधवांकडून मी त्यांचे आभार मानत असल्याचे आ बच्चू कडू म्हणाले.

# खा.बळवंत वानखडे यांनी घेतली महानगर पालिकेत मॅरेथॉन बैठक

## नागरिकांच्या समाश्या सोडविण्याचे मनपा ला दिले निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती** शहरात साफसफाई, मालमत्ता करात झालेली भरमसाठ वाढ, घनकचरा व्यवस्थापनाची वाट लागली आहे. आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून डेंग्यूच्या रुग्णासह साथीचे रोग वाढत आहेत. महापालिका प्रशासनाने त्वरित उपाययोजना करून नागरिकांना भेडसावत असणाऱ्या समस्या सोडवाव्यात, असे निर्देश खासदार बळवंत वानखडे यांनी महापालिका प्रशासनाला दिले. नागरिकांच्या समस्या व कारभारासंदर्भात अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. महापालिकेच्या महापालिका चांगलीच कानउघडणी केली. महापालिकेत गत तीन वर्षांपासून प्रशासक राजवट अमरावतीकर अनुभवत आहे. गत काळामध्ये महानगरपालिकेत प्रशासकांचे अनेक निर्णय अत्यंत वादग्रस्त ठरलेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने मालमत्ता करांमध्ये करण्यात आलेली करवाढ, साफसफाईचे झोन निहाय कंत्राट, मोठ्या प्रमाणात शहर विकास आराखड्यातील बदलविलेली आरक्षणे याच पार्श्वभूमीवर खा. बळवंत वानखडे यांनी मंगळवाररोजी आढावा बैठक घेतली. अमरावती महानगरात गत काही महिन्यांपासून आरोग्य व्यवस्था कोलमडली आहे. शहरात अस्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनाचा अभाव यामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याचे मूळ साफसफाईची नवी व्यवस्था झोन निहाय करण्यात दडलेले आहे.या बेठकी दरम्यान नवीन करप्रणाली लागू करू नये या विषयावरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

# ९ शेतकऱ्यांना २.२७ लाखाने लुबाडले

## फळपीक विम्याच्या दिल्या बनावट पावत्या – सीएससी संचालकाविरूद्ध गुन्हा दाखल




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती** – येथील एका सीएससी केंद्रावर काही शेतकर्यांनी फळपीक विमा काढण्यासाठी संचालकाकडे प्रीमियमची रक्कम दिली. त्याने ती रक्कम भरल्याच्या संगणकीकृत पावत्या शेतकर्यांना दिल्या; परंतु त्या शेतकर्यांना नुकसान झाल्यावरही पीकविमा संरक्षित रक्कम मिळाली नाही. त्यावेळी शेतकर्यांनी चौकशी केली असता त्याने बनावट पावत्या देऊन ही प्रीमियम रक्कम शासनाकडे भरलीच नसल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी शेतकर्याच्या तक्रारीवरून वरूड पोलिसांनी सीएससी संचालक अमोल चरणदास क्षीरसागर (३०) रा. वरूड यांच्याविरुद्ध रविवारी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात पोलिसांकडे नीलेश दिनेश देशमुख (३९) रा. टेंभुरखेडा यांच्यासह आठ शेतकर्यांनी तक्रार दिली आहे. २०२२ मध्ये नीलेश देशमुख यांच्यासह अन्य काही शेतकर्यांनी क्षीरसागर यांच्या सीएससी सेंटरवर जाऊन फळपीक विमा घेण्यासाठी २ लाख २७ हजार ३८४ रुपये प्रीमियम रक्कम भरली. याच दरम्यान काही शेतकर्यांनी फळपीक विमा प्रीमियम रक्कम बँकेत भरून विमा घेतला. कारण बँकेत आणि सीएससी अशा दोन्ही ठिकाणाहून विमा घेण्याची सुविधा उपलब्ध होती.

दरम्यान ज्या शेतकर्यांनी बँकेत प्रीमियम भरला होता, त्या शेतकर्यांना झालेल्या नुकसानीचा विमा मंजूर होऊन २०२३ मध्ये पैसे मिळाले. वास्तविक, यावेळी नुकसान या आठ शेतकर्यांचेही झाले, परंतु त्यांना विमा रक्कम मिळाली नाही. त्यांनी याबाबत बँकेत चौकशी केली असता त्यांच्या खात्यात विम्याची रक्कमच जमा झाली नव्हती. दरम्यान या शेतकर्यांनी क्षीरसागर यांच्याकडे विचारणा केली, त्यावेळी त्याने सुरुवातीला तुमची रक्कम भरली आहे, विमा येईल अशा पद्धतीने उडवाउडवीचे उत्तर दिले. शेतकर्यांना संशय आल्यानंतर मात्र त्यांनी पोलिस ठाण्यात धाव घेतली. क्षीरसागरने त्यांना पैसे भरल्याची पावती दिली होती. ती त्यांनी पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी ही पावती कृषी विभागाच्या अधिकार्यांकडून तपासून घेतली. त्यावेळी ही पावती बनावट असल्याचे समोर आले.

# आमदार टी राजा यांची तिवसा पोलिसांकडून ३० मिनिटे विचारपूस

## परतवाडा येथील दहीहंडी कार्यक्रमाला जात होते टी राजा



विदर्भ प्रजासत्ताकदि.२८ तिवसा ३तेलंगणाचा वादग्रस्त भाजप आमदार टी. राजा अमरावती जिल्हा दौऱ्यावर असून आज परतवाडा येथे दहीहंडी कार्यक्रमात ते उपस्थित राहणाऱ्यासाठी अमरावतीत दाखल झाले होते. दरम्यान तिवसा पोलिसानी त्यांना रोखून पोलीस ठाण्यात २० मिनिट चौकशी व त्याची विचारपूस करत अमरावती जिल्ह्यात वादग्रस्त व जातीय किंवा धर्मांध भाषण केल्यास कायदेशीर कारवाई करून अटक करण्यात येईल, अशी तंबी दिली. टी राजा यांचा वादग्रस्त वक्तव्य करण्याचा इतिहास आहे. त्यामुळे जुनी पार्श्वभूमी लक्षात घेता पोलिसांनी त्याला सामाजिक सलोखा टिकून राहिल, कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना केल्या.

तेलंगणातील भाजपचे नेते, प्रखर हिंदुत्ववादी अशी ओळख असलेले टी. राजा सिंह हे मंगळवारी नागपूरहूनअमरावती जिल्ह्यात दहीहंडी स्पर्धे साठी आले असता त्यांना ५.३० वाजता दरम्यान शहरातील पेट्रोल पंप चौकात बेरीकेट्स लावून रोखण्यात आले. तेथून पोलीस बंदोबस्तमध्येत्यांना तिवसा पोलीस स्टेशन येथे नेण्यात आले.

अचानक एवढ्या मोठ्या वाहनांचा ताफा पाहून तिवसा पोलीस स्टेशनसमोर नागरिकांची एकच गर्दी झाली होती.

आमदार टीराजा सिंह हे नेहमी आपल्या वादग्रस्त वक्तव्याने चर्चेत असतात. त्यामुळेच त्यांना तिवसा येथे डिटेन करत तासभऱ्यात नोटीस देऊन सोडण्यात आले.

# महिलेचा व्हिडीओ करणे आले अंगलट

## पोलिसांनी एकाला ठोकल्या बेड्या

**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.२९ अमरावती** – एका महिलेचा व्हिडिओ काढणाऱ्या चार अज्ञात युवकांविरुध्द कोतवाली पोलिसांनी शनिवारी (दि.२४) गुन्हा नोंदविला आहे. ही घटना अमरावतीत राजकमल चौकाजवळील रस्त्यावर घडली आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दाखल घेत रील बनविणाऱ्या एका आरोपीला अटक केली आहे. तर अल्पवयीन मुलांनाही ताब्यात घेतले आहे.

आकिब शहा उर्फ राजा रा.नमुना असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असलेल्या परिसरात हि महिला भाजी घेण्यासाठी राजकमल ते राजापेठ रस्त्याने पायी जात होती. यावेळी तिला दर्ग्याजवळील रस्त्यावर १० रुपयांची नोट दिसली. ती नोट उचलण्यासाठी खाली झुकली असता अज्ञात तरुणाने ती नोट त्यांच्याकडे ओढून घेतली. त्यानंतर त्या महिलेने तेथील एका झाडाच्या मागे पाहिले असता तेथे चार तरुण बसलेले दिसले. ते महिलेकडे पाहून हसायला लागले. दरम्यान, त्या तरुणांनी या घटनेचा व्हिडिओही मोबाईलमध्ये शुट केल्याचे महिलेच्या लक्षात आले. तिने याकडे दुर्लक्ष करून ती भाजी घेण्यासाठी निघून गेली. तिकडून परत येत असताना या तरुणांनी पुन्हा डॉ.पाठक हॉस्पिटलजवळ असेच कृत्य केले.

# आ. राणा यांचे कार्यकर्ते जिवे मारण्याच्या धमक्या देतात

## नितीन कदम यांची राणा विरोधात पोलिसात तक्रार




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती** – बडनेरा मतदारसंघाचे आमदार रवि राणा यांचे कार्यकर्ते विविध माध्यमातून मला धमक्या देतात. पोलिसांच्याही हे लक्षात आल्याने त्यांनी माझ्या कार्यालयावर बंदोबस्त लावला आहे. काही अनुचित प्रकार घडल्यास त्याला आ. राणा जबाबदार राहतील, असे स्पष्ट करून या प्रकरणाची आपण पोलिसात तक्रार केल्याचे संकल्प शेतकरी संघटनेचे संस्थापक नितीन कदम यांनी सांगितले.

मविआत आम्ही सहभागी आहोत. येणारी विधानसभा निवडणुक बडनेरा मतदार संघातून आपण लढविणार आहे. त्यामुळे आ. राणा यांना पोटशूळ उठला आहे. त्यांचे कार्यकर्ते कारण नसताना दमदाटी करीत आहे. समाजमाध्यमांवरून धमक्या देत आहे. ही दंडेली खपून घेतल्या जाणार नाही. उद्या काही आमचे बरे वाईट झाले तर आ. राणा व त्यांचे कार्यकर्ते जबाबदार राहतील. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन आ. राणा यांना समज द्यावी. होत असलेल्या प्रकाराची तक्रार फ्रेजपुरा पोलिसांना दिल्याचे त्यांनी सांगितले.

# माता रुक्मिणीचे माहेरघर असलेल्या कौंडण्यपूर येथे भव्य कॉरिडार विकसित व्हावा

## रविराज देशमुख यांची पंतप्रधान नरेंद्रजी मोदी व राज्य सरकारकडे मागणी



**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

**कौडण्यपूर** – अंधकारात प्रकाशाची वाट दाखवणारा, दैत्यांचा कर्दनकाळ ठरणारा, आपल्या बासुरीने सर्वांना मोहून टाकणारा, आणि जगाला तत्वज्ञाचे ज्ञानामृत पाजणारा भगवान श्रीकृष्ण यांचा जन्मसोहळा म्हणजे जन्माष्टमी उत्सव विदर्भाची पुरातन राजधानी व माता रुख्मिणीचे माहेरघर असलेल्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील इस्कॉन मंदिरात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी सांस्कृतिक व भक्तिमय कार्यक्रमांची मेजवानी व त्यानंतर रात्री १२ वाजता फटाक्यांच्या आतिषबाजीत व भक्ती संगीतामध्ये कृष्ण जन्म पार पडला. त्यानंतर २६ ऑगस्ट रोजी भागवत व कृष्ण लीला प्रवचन संपन्न झाले.

या कार्यक्रमाला भाजपा ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष व प्रदेश कार्यकारिणी सदस्य रविराज देशमुख यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी यांच्याहस्ते पूजन व आरती करण्यात आली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. कृष्ण जन्माष्टमी निमित्य इस्कॉन मंदिराच्या वतीने आयोजित जन्माष्टमी उत्सवामध्ये परिसरातील भाविक भक्तांनी भक्तिरसाचा आनंद लुटला

वाराणसीच्या धर्तीवर कौडण्यपूर साठी पंतप्रधान मोदीजींची भेट घेऊन भव्य कॉरिडॉर उभारण्याचा आमचा संकल्प असून, त्यासाठी प्रशासनाकडे जो पाठपुरावा आम्हाला करता येईल. तो आम्ही नक्की करू, मुख्य म्हणजे उपमुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांच्याकडे सदर प्रस्ताव सादर केला आहे. ते सुद्धा कौंडण्यपूर कॉरिडॉर साठी आमच्या सकारात्मक पाठीशी आहे, त्यामुळे तिवसा तालुक्याचा खऱ्या अर्थाने विकास होईल. येत्या काळात याठिकाणी पर्यटकांची गर्दी व स्थानिकांना उद्योग व युवकांच्या हाताला काम, असा प्रोजेक्ट लवकरच तयार करू आणि देशातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्रामध्ये कौडण्यपूर चा समावेश करून अनेक विकासकामे पूर्ण करण्याचा आमचा संकल्प आहे, असा विश्वास यावेळी रविराज देशमुख यांनी व्यक्त केला.

# ‘धोकेबाजांचा हिशोब होईल’ कडूंच्या बालेकिल्ल्यात राणा कडाडल्या

## बच्चू कडूंचा तोडी बहाद्दर, ब्लॅकमेलर, सुपारीबाज, ढोंगी, गारोडी असा केला उल्लेख

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ परतवाडा –** लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांचा अमरावती लोकसभा निवडणुकीत पराभव झाला. या पराभवला महायुतीचा घटक पक्ष असलेल्या बच्चू कडूंना राणा दाम्पत्याने कारणीभूत ठरवलं. तेव्हापासून बच्चू कडू आणि राणा दाम्पत्यातील संघर्ष हा टोकाला गेला आहे. त्यामुळे हे दोघेही एकमेकांवर टिका करण्याची एकही संधी सोडत नाहीत. त्यात बच्चू कडूंचे होमग्राऊंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परतवाड्यात जावून नवनीत राणांनी थेट बच्चू कडूंनाच आव्हान दिलं आहे. यावेळी कडूंवर तोंडसुख घेत धोखेबाजांचा हिशेब करायचाच असा इशारा दिला आहे.

अमरावतीच्या परतवाड्यात भाजपचे नेते आणि तेलंगणाचे आमदार टी. राजा यांच्या उपस्थितीत दहीहंडीचे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमादरम्यान नवनीत राणा यांनी प्रहारचे प्रमुख आमदार बच्चू कडू यांच्यावर जोरदार टिका केली. सुपारी बाजांनी माझा पराभव करण्याची सुपारी घेतली होती. असे म्हणत नवनीत राणांनी थेट आपला मोर्चा बच्चू कडूंच्या दिशेने वळवला. कडू यांचा उल्लेख त्यांनी तोडी बहाद्दर, ब्लॅकमेलर, सुपारीबाज, ढोंगी, गारोडी असा केला. तर वीस वर्षात अचलपूर मतदार संघाचे नेतृत्व करणाऱ्या बच्चू कडूंनी तुम्हाला रोजगार दिला काय? असा प्रश्न राणांनी दहीहंडीत सहभागी झालेल्या जनसमुदायाला उपस्थित केला.

वीस वर्षात एकही उद्योग अचलपूर मतदारसंघात आला नाही.



स्वतःसाठी सात पिढ्यांच्या रोजगारांची व्यवस्था त्यांनी केली आहे असा आरोप यावेळी केला. त्यामुळे यावेळी सुपारी बहाद्दराला अचलपूर मंत्री असताना येथील फिनले मिल बंद पडली. ती सुद्‌ त्यांना सुरू करता आली नाही. वीस वर्षात भ्रष्टाचार करून सुपारी बहाद्दराने फक्त पैसे कमावले. एकाही व्यक्तीला रोजगार उपलब्ध करून दिला नाही. पण मतदार संघातून आऊट करणार की नाही? असा प्रश्न त्यांनी यावेळी विचारला.

तसे केले तर सुपारी पण आऊट होईल आणि नाटक सुद्धा बाहेर येईल असा हल्लाबोल त्यांनी बच्चू कडू यांच्यावर केला. धोकेबाजांचा हिशेब होईल. त्याला माफी नाहीच अशी आक्रमक भूमिका नवनीत राणा यांनी मांडली. बच्चू कडूंच्या होम ग्राउंड नवनीत राणा यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेची त्यामुळे सगळीकडे जोरदार चर्चा आहे. लोकसभेला लोकांच्या भविष्यासाठी उभी होती. आता बेईमान लोकांना जागा दाखवण्यासाठी मैदानात असणार असल्याचं त्या म्हणाल्या.

बच्चू कडूंवर टीकास्त्र सोडणाऱ्या नवनीत राणांनी मात्र स्वतः खासदार असताना केलेल्या कामांची यादी यावेळी दाखवली. रेल्वे वॅगन कारखाना, मेडिकल कॉलेज, टेक्सटाईल पार्क, शकुंतला रेल्वे प्रकल्प, अचलपूर जिल्हा निर्मितीसाठी सुरू असलेले प्रयत्न या महत्वपूर्ण कामांसाठी आपला सातत्याने पाठपुरावा केला. यामुळे जिल्ह्याच्या विकासात मोठी भर पडल्याचा दावा यावेळी नवनीत राणा यांनी केला. मात्र त्यांनी केलेल्या टिकेमुळे अमरावतीचे राजकारण पुन्हा एकदा तापण्याची दाट शक्यता आहे.

# जिल्हास्तरीय जलतरण आणि बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन

### रंगोली स्पोर्टस् क्लब येथे रंगणार स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती** – रंगोली स्पोर्टस् क्लबच्या वतीने जिल्हास्तरीय जलतरण आणि बॅडमिंटन क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून प्रिया पार्क, नवसारी चौक, अमरावती येथे नव्यानेच उभारण्यात आलेल्या क्रीडा संकुलात येत्या १ सप्टेंबर रोजी या स्पर्धा पार पडणार आहेत.

या क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ १ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्ह्याचे माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख हे राहणार आहेत. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, नागपूर येथील देशमुख ट्रेडिंग कंपनीचे संचालक प्रभाकर देशमुख, भुयार एज्युकेअरचे संचालक बंडोपंत भुयार सर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

या स्पर्धेच्या निमित्ताने अमरावतीच्या क्रीडा तपस्वींचा देखील सन्मान केला जाणार आहे.

### बक्षिसांची होणार लयलूट

स्पर्धेत भाग घेणाऱ्या खेळाडूंना टीशर्ट ,मोमेंटो ,व रोख स्वरूपात बक्षिसे देण्यात येणार आहे सध्या १०० ते खेळाडूंचा प्रवेश या ठिकाणी निश्चित झाला असून विजेत्या स्पर्धकांनावर बक्षिसांची लयलूट करण्यात येणार आहे.

गेल्या अनेक दशकांपासून जिल्ह्यात जलतरण आणि बॅडमिंटनच्या खेळात मार्गदर्शक म्हणून महत्वाची भूमिका बजावणारे गुरूवर्य यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात जलतरण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि महाराष्ट्र राज्य सरकारचा शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त प्राध्यापक डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, निवृत्त प्राध्यापक डॉ. टॉमी जोस, क्रीडा रत्न पुरस्कारप्राप्त प्राध्यापक डॉ. योगेश निर्मळ, शिवछत्रपती

### खेळाचे महत्व वाढावे – नितीन देशमुख

हल्ली च्या दिवसांमध्ये खेळांकडे विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष होत आहे अमरावती जिल्ह्यात या आधी जसे नामवंत खेळाडू होऊन गेले आहेत तश्याच प्रकारचे खेळाडू येत्या काळात हि जिल्ह्यात तयार व्हावे व विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत खेळांना सुद्धा महत्व द्यावे हाच प्रमुख उद्देश या स्पर्धेमागचा आहे.

पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ. मंगेश व्यवहारे, क्रीडा रत्न पुरस्कार प्राप्त प्राध्यापिका डॉ. प्रतिमा भोंडे, महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष प्राध्यापक डॉ. संजय तिरथकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे. अमरावती जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष सुनील चिमोटे, बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव संजय चौधरी यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

बॅडमिंटन स्पर्धेची सुरूवात ३० ऑगस्ट रोजी होणार असून



समारोप १ सप्टेंबरला होणार आहे. पारितोषिक वितरण समारंभाला जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, किसान मोर्चाचे उपाध्यक्ष बाळासाहेब वानखडे डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, डॉ. टॉमी जोस, डॉ. योगेश निर्मळ, डॉ. मंगेश व्यवहारे, डॉ. प्रतिमा भोंडे, डॉ. संजय तिरथकर सुनील चिमोटे, संजय चौधरी हे उपस्थित राहणार आहे.

क्रीडा रसिकांनी या आयोजनात उपस्थित रहावे आणि खेळाडूंचा उत्साह वाढवावा, असे आवाहन रंगोली स्पोर्टस् क्लबचे संचालक नितीन देशमुख, कल्पना देशमुख, भूषण देशमुख आणि निकिता देशमुख यांनी केले आहे.

# रेल्वेमधील खाद्यपदार्थांची गुणवत्ता तपासण्यास सुरुवात

## पँट्री कारमध्ये जाऊन स्वच्छता, खाद्यपदार्थांची तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८बडनेरा –** लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांमध्ये प्रवाशांना पँट्री कारमधून खाद्यपदार्थ, जेवण तयार करून दिले जाते. या खाद्य पदार्थांची गुणवत्ता चांगली की वाईट, स्वच्छतेचे पालन केले जाते का, याची तपासणी करण्यासाठी रेल्वेद्वारे विशेष अभियान राबवण्यात येत आहे. याअंतर्गत लांब पल्ल्याच्या विविध रेल्वे गाड्यांमध्ये अचानक पोहोचून रेल्वे अधिकारी पँट्री कारची तपासणी करण्यात येत आहे.

प्रवाशांना गुणवत्तापूर्ण, चवदार, ताजे खाद्यपदार्थ, शुद्ध पाणी दिले जाते की नाही. तसेच पँट्री कारच्या स्वच्छतेकडे लक्ष दिले जाते की नाही याची तपासणी केली जात



असून, समरसता, मुंबई–हावडा व इतर रेल्वे गाड्यांमधील पँट्री कारची तपासणी करण्यात आली. प्रवाशांसाठी शिजवल्या जाणाऱ्या खाद्य पदार्थांसाठी कोणत्या ठिकाणचे पाणी वापरले जाते. ते वापरण्यास योग्य आहे का, तयार खाद्यपदार्थ कशाप्रकारे ठेवले जातात, त्यांचे पॅकिंग व्यवस्थित केले जाते की नाही, कशाप्रकारे खाद्यपदार्थ तयार केले जातात, ते ताजे असतात की नाही, याचा तपास रेल्वे अधिकाऱ्यांद्वारे करण्यात आला.

या वेळी पँट्री कारमध्ये ज्या उणिवा आढळल्या त्या तत्काळ दूर करून खाद्यपदार्थ तयार करण्याचे निर्देश पँट्री कारच्या व्यवस्थापकांना देण्यात आले. सोबतच त्यांना चांगलेच खडसावून तत्काळ सुधारणा करण्याची सूचना रेल्वे अधिकाऱ्यांद्वारे करण्यात आली.

# वन्य प्राण्यांकडून होणाऱ्या नुकसानीबाबत सोलर झटका मशीन योजनेचा लाभ द्यावा

## – ॲड. ठाकूर यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील आणि राज्यातील वनक्षेत्राला लागून असलेल्या अनेक गावांमध्ये वन्य प्राण्यांकडून मानवी हल्ल्यांसह शेत पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. वन्य प्राण्यांकडून होणारे हे नुकसान टाळण्यासाठी राज्य सरकारने सोलर झटका मशीन योजना राबवावी अशी विनंती राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे केली असल्याची माहिती काँग्रेसच्या आमदार ड.यशोमती ठाकूर यांनी केली आहे. अमरावती जिल्ह्यातील तिवसा मतदारसंघात अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे रोही, नीलगाय, रानडुक्कर आणि अन्य वन्य प्राण्यांच्या आक्रमणामुळे नुकसान होते आहे. यामुळे



शेतकरी हवालदिन झाला असून या त्रासापासून मुक्तता व्हावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. वन्य प्राण्यांचे आक्रमण टाळण्यासाठी वनविभागाकडून कुंपण तसेच सोलर झटका मशीन या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना दिला जातो मात्र तिवसा तालुक्यातील काही गावांना या योजनेचा लाभ मिळत असून अनेक गावांमध्ये वन्य प्राण्यांकडून शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असतानाही त्यांना सोलर झटका मशीन योजनेचा अद्याप कोणताही लाभ देण्यात आलेला नाही. परिणामी शेतकऱ्यांचे नुकसान सातत्याने सुरूच असून शेतकरी या त्रासाला कंटाळला आहे.

# विदर्भ महाविद्यालयात ‘आदिवासी साहित्य, संस्कृती आणि भाषा’ विषयावर राष्ट्रीय परिषद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती**

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेत २३ व २४ ऑगस्ट रोजी 'आदिवासी साहित्य, संस्कृती आणि भाषा' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. दि. २३ ऑगस्ट रोजी स.१० वा. गुजरात येथील बिरसा मुंडा राष्ट्रीय आदिवासी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मधुकरजी पाडवी यांनी 'आदिवासींचा कल्पवृक्ष' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोहाच्या रोपट्याला पाणी घालून परिषदेचे उद्घाटन केले. उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले, की साहित्याला जात, धर्म नसतो. आदिवासींच्या मौखिक परंपरा समृद्ध असून त्यांच्या मौखिक परंपरेत त्यांचे स्वतंत्र रामायण आहे. त्यासाठी आदिवासींच्या बोली जतन करून आदिवासी साहित्य समृध्द करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. परिषदेचे बीजभाषक म्हणून मनोगत व्यक्त करताना जे.एन.यू. चे प्राध्यापक डॉ. गंगा सहाय मीना यांनी, आदिवासींचे लोकसाहित्य, लिखित साहित्य आणि आदिवासीएत्तर लेखकांनी लिहिलेले आदिवासी साहित्य विचारात घेऊन आदिवासी साहित्यातील जीवनमूल्यांचा शोध घेण्याची आवश्यकता व्यक्त केली. आदिवासी साहित्य हे इतर कुठल्याही साहित्याहून वेगळे असून त्याची दखल घेतली गेली नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक डॉ. सुबोध भांडारकर होते. त्यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत करून निबंध वाचकांना शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी मंचावर डॉ. जनार्दन काटकर, डॉ. राजेश श्रीखंडे व डॉ. जयंत चौधरी होते. डॉ. विश्वनाथ बिटे यांनी सूत्रसंचालन व आभार मानले. दुपारच्या दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी मा. रामू जारेकर हे होते. या सत्रात मुंबई येथील प्रसिध्द चित्रकार सुधाकर यादव यांनी वारली चित्रकला, तिची मूलतत्वे, चित्रकलेची भाषा, संबंध वारली जीवन संस्कृती आणि वारली चित्रकलेचे जनक जिव्या सोमा म्हशे यांच्या कार्याचा आढावा घेतला. सत्राध्यक्ष रामू जारेकर यांनी कोरकुंची उत्पत्तीकथा, त्यांच्या परंपरा, कोरकुंचे सामाजिक जीवन आणि कोरकू व राजा



रावण यांचा सहसंबंध सोदाहरण स्पष्ट केला.डॉ. सुनील मावसकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

दि २४ ऑगस्ट रोजी नंदुरबार येथील आदिवासी साहित्य व सांस्कृतिक चळवळीचे कार्यकर्ते कॉ. वाहरू सोनवणे यांची डॉ. काशीनाथ बऱ्हाटे यांनी मुलाखत घेतली. आदिवासी साहित्य चळवळीत येण्याची प्रेरणा मला अंबरसिंग महाराजांनी दिली. आज आदिवासी एकता परिषद गेल्या तीस वर्षांपासून सांस्कृतिक महासंमेलनाचे आयोजन करून आदिवासींची अस्मिता जपत आहे. एकूणच आदिवासी साहित्य व सामाजिक चळवळींची दिशा आणि दशा यावर वाहरूजींनी रोखठोक मते मांडली. सत्राच्या अध्यक्षा झारखंड येथील प्रसिध्द लेखिका मा. वंदनाजी टेटे यांनी भारतीय आदिवासी साहित्याची स्थिती, आदिवासी साहित्य अनुवादित झाल्याशिवाय ते इतरांना कळणार नाही अशी खंतही व्यक्त केली.झारखंडमधील आदिवासी बोलींना राजभाषेचा दर्जा मिळावा म्हणून स्थानिकांनी केलेले भाषा आंदोलन आणि त्यातून पाच आदिवासी बोलींना मिळालेला राजभाषेचा दर्जा यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ममता मेहता यांनी करून सर्वांचे आभार मानले.

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत दोनशे पन्नास निबंध वाचकांनी ऑफलाईन व ऑनलाईन मोडवर निबंधवाचन केले. डॉ. वैजनाथ अनमूलवाड, डॉ. प्रमोद गारोडे, डॉ. रविंद्रकुमार सिरसाठ, डॉ. राजेश श्रीखंडे, प्रा. त्र्यंबक वहाने, प्रा. सुधीर मोरे, प्रा. यशवंत भांडकोळी, डॉ. विनय वसूले, डॉ. अनिलकुमार प्रसाद, डॉ. प्रज्ञाशैली सवाई, डॉ. चिंतामण धींदळे, डॉ. युवराज शिंदे, डॉ. मनिष गायकवाड, डॉ. जनार्दन काटकर आदींनी परीक्षक म्हणून काम पाहिले. परिषदेच्या समारोप सत्राचे अध्यक्षस्थान नागपूर विभागाचे उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण यांनी भूषविले. परिषदेचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल त्यांनी संस्थेचे अभिनंदन केले. या परिषदेसाठी डॉ. दुर्गेश बोरसे, डॉ. कपिल गिरी, प्रा. संतोष माहोलकर, डॉ. जयंत चौधरी, डॉ. अनुपमा देशराज आदींनी सहकार्य केले. डॉ. जयंत चौधरी यांनी सर्व संशोधक, अभ्यासक व निमंत्रित पाहुण्यांचे आभार मानले.

